CB
60:40

# TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH, PUNE

## BACHELOR OF COMPUTER APPLICATIONS (B.C.A.)/
## BACHELOR OF COMPUTER APPLICATIONS (CYBER SECURITY)
## EXAMINATION : DECEMBER - 2024
## SEMESTER – III

**Sub: Marathi (BCA23 –305/BCAC23-305)**

**दिनांक: २८/१२/२०२४** **गुण : ३०** **वेळ : दु. २.०० ते दु. ३.३०**

**सूचना :** १) सर्व प्रश्न सोडवा.
२) उजवीकडील अंक त्या प्रश्नांचे गुण दर्शवितात.
३) उत्तरपत्रिकेत प्रश्नपत्रिकेतील प्रश्नक्रमांक लिहिणे आवश्यक आहे.

**प्रश्न १ खालील प्रश्नांची योग्य पर्याय निवडून उत्तरे द्या. (०५)**

१. सारलेखकाने मूळ मजकुराशी कोणती भूमिका घ्यावी ?
अ) प्रामाणिक ब) विरोधी
क) विसंवादी ड) अनभिज्ञ

२. दीर्घ स्वर? योग्य पर्यायाची निवड करा.
अ) अ, ए ब) अ, इ
क) आ, औ ड) अ, आ

३. वाक्यातील शब्द किंवा संकल्पनेचे अधिक स्पष्टीकरण देण्यासाठी कोणते चिन्ह वापरतात?
अ) गोल कंस ब) विकल्प चिन्ह
क) लोप चिन्ह ड) अपसरण चिन्ह

४. औपचारिक पत्रलेखनात कोणत्या गोष्टींचे पालन करावे?
अ) सर्व पर्याय बरोबर आहेत ब) मुद्देसूद लेखन
क) संक्षिप्त स्वरूप ड) नेमकेपणा

५. दोन्ही बाजूंनी चर्चा करून एखादे ठोस मत पटवून दिलेले असते. निबंध प्रकार ओळखा?
अ) आत्मनिवेदनपर निबंध ब) कल्पनाविलासात्मक निबंध
क) चरित्रात्मक निबंध ड) वैचारिक निबंध

**प्रश्न २ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन) (१५)**

१. आत्मनिवेदनपर आणि कल्पनाविलासात्मक निबंध प्रकारातील फरक स्पष्ट करा.
२. विरामचिन्हांचे प्रकार आणि अर्थ थोडक्यात सांगा.
३. नोकरी मिळवण्यासाठी केलेल्या अर्जाचे उदा. द्या.
४. शुद्धलेखनाचे नियम थोडक्यात सांगा.
५. सारांशलेखन करतांना कोणती काळजी घ्यावी?

**प्रश्न ३ कोणताही एक प्रश्न सोडवा (१०)**

१. ३०० शब्दात निबंध लिहा.
**– सामाजिक माध्यमे आणि आजची तरुणाई**

**किंवा**

२. **दिलेल्या उताऱ्याचे १/३ सारांशलेखन करा, उताऱ्यास योग्य शिर्षक द्या.**

मनाला केवळ आनंद देणे किंवा मनाचे निव्वळ रंजन करणे हाच कलेचा हेतू आहे, असे

म्हणणाऱ्या अडाणी माणसांची कीव करावीशी वाटते. त्यांना निसर्गाच्या उत्क्रांतीमय जीवनाचे रहस्य मूळीच कळलेले नाही, असे म्हणावयास पाहिजे. सुंदर चित्र पाहिल्याने, मधुर गायन ऐकल्याने, उत्कृष्ट मूर्ती पाहिल्याने आपल्याला आनंद होतोच होतो. पण त्यामुळे आपली जीवनशक्ती अधिक समृद्ध होते. भावनांचा विकास होतो आणि बुद्धीची उत्क्रांती होते. कलेच्या उपभोगाने आपण अधिक सुखी, अधिक तृप्त आणि अधिक उन्नत होतो. म्हणून निसर्गाच्या उत्क्रांतीचे अपरिहार्य कार्य चालू ठेवणे, हेच कलावंताच्या आयुष्याचे ध्येय आहे. म्हणूनच समाजाच्या आनंदासाठी, प्रगतीसाठी आणि उद्धारासाठी कलेची आणि कलावंताची जरुरी आहे. कलावंताच्या पावलांनी समाज चालत असतो, कलावंताच्या डोळ्यांनी समाज पाहत असतो आणि कलावंताच्या बुद्धीने समाज विचार करीत असतो. हजारो वर्षाच्या काळात मानवजातीने प्रगतीचा आणि संस्कृतीचा जो टप्पा आज गाठलेला आहे, त्याच्या श्रेयाचा मोठा वाटा कलावंतांना द्यावयला पाहिजे. कलावंताची कला हि समाजासाठी आहे;आणि कलावंताकडून समाज हा सर्वस्वी असहाय आहे.

**किंवा**

३. खालील उतारा शुद्धलेखनासह योग्य विरामचिन्हे वापरून पुन्हा लिहा.

साने गुरुजी म्हणजे अबालवृद्धांचे भावविश्व संस्कारित करणारे थोर साहित्यिक कथा कादंबरी कविता चरित्र वैचारीक लेखन अशी वीविध प्रकारची वाङ्मयनिर्मिती त्यांनी केली असली तरी त्यांच्या श्यामच्या आइ चे मराठी वाङ्मयातील स्थान अनन्यसाधारण आहे श्यामची आई हे मराठी वाङ्मयाचे अक्षर लेणे आहे श्यामची आई ही कथा किंवा कादबरी नाही त्या आठवणी आहेत आठवणींची साखळी किंवा साने गुरुजींच्या बालजीवनाची आत्मकहाणि म्हणा हवे तर उत्कट रम्यतेच्या वलयाने या आठवणी भारलेल्या आहेत यातला श्याम म्हणजे खुद्द साने गुरुजीच आश्रमातले मित्र श्यामला म्हणत तु आमच्या सर्वांचे ऐकून घेतोस पण स्वतःचे मात्र काहीच सांगत नाहीस तुझ्या जिवनात ही माधुरी प्रेम सरलता कोमलता गोड हसणे सेवावृत्ती निरहंकारिता हे कुठून आले सांग मित्रांचे हे बोलणे ऐकल्यावर श्यामचे मन आईच्या आठवणींनी भरून आले त्याचे डोळे वाहू लागले तो म्हणाला गड्यानो हे सारे माझ्या आईचे देणे आई माझा गुरु आई कल्पतरु मित्रांच्या प्रेमळ आग्रहाखातर रोज रात्री श्याम या आठवणी सांगू लागला पुढे १९३३ साली नाशिकच्या तुरुंगात असताना सलग पाच रात्री जागून गुरुजींनी या आठवणी लिहून काढल्या त्यातून श्यामची आई हे पुस्तक साकार झाले.